**OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**
**Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511**
**Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in**

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

**प्रेस नोट :-** दिनांक :- ०९/०५/२०२५.

**प्रति,**

**मा.संपादक**

.....................

**विषय :-** गावठी कट्टा विक्री करीता आलेल्या इसमांना स्था.गु.शा.जळगाव च्या पथकाने केले जेरबंद.

--==००==--

जळगांव जिल्ह्यात मिश्र वस्तीच्या ठिकाणी व इतर ठिकाणी वावरत असतांना सण उत्सवाच्या काळात काही समाजकंटाकडून शस्त्र संदर्भात कारवाई करा. असे वेळोवेळी आदेशीत करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा.डॉ.महेश्वर रेड्डी सो. पोलीस अधीक्षक जळगांव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगांव यांच्या मार्गदर्शना खालील स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांना मार्गदर्शनपर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

दि.०८/०६/२०२५ रोजी सहाफौ.रवी नरवाडे व पो.हे.कॉ.गोपाळ गव्हाळे यांना गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन इसम सिरवेल, ता.भगवानपुरा जि.खरगोन (मध्यप्रदेश) येथून अवैधरित्या गावठी कट्टे विक्री करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात पाल ता.रावेर च्या मार्गे येणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सदरची माहिती स.फौ./ रवी नरवाडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संदीप पाटील यांना बातमी कळविली असता, वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव कडिल पो.उप.निरी.शरद बागल, सहाफौ.रवी नरवाडे, पो.हे.कॉ.गोपाल गव्हाळे, पो.हे.कॉ.नितीन बाविस्कर, पो.कॉ.बबन पाटील, चा.पो.हे.कॉ.दिपक चौधरी यांचे पथक तयार करुन, त्यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कारवाई करणे बाबतच्या सुचना दिल्या. त्या प्रमाणे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी रावेर पोलीस स्टेशन अंतर्गत पाल दुरक्षेत्र येथे जंगल परिसरात सापळा रचला. मिळालेल्या माहितीप्रमाणे पाल ता.रावेर जि जळगाव च्या जंगल परिसरात पथकातील अधिकारी व कर्मचारी सापळा लावून थांबलेले असतांना, अंदाजे ४५ वर्षाचा इसम TVS RAIDER कंपनीची क्र. MP-१०-ZC-९६५० काळया रंगाची मोटार सायकलवर डोक्याला निळी पगडी बांधलेला दिसून आला तसेच एक अंदाजे २५ वर्ष वयाचा इसम TVS SPORT कंपनीची MP-१०-MV-१४६२ काळया रंगाची मोटार सायकलवर येतांना दिसले. त्यांना फॉरेस्ट नाका पाल येथे सापळा पथकातील अंमलदार थांबवत असतांना, ते पळून जाण्याचा प्रयत्न करु लागले त्यावेळी ते सापळयातुन पळुन जाण्यात यशस्वी झालेत. त्यांचा सिनेस्टाईल पाठलाग करुन व पुढे दोन्ही रस्त्यावर लावलेल्या सापळयात आरोपीतांना पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्या दोन इसमांना शिताफीने ताब्यात घेतले.

त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून ०२ गावठी कट्टयासह ०२ मोटार सायकली, ०२ मोबाईल हॅन्डसेट असे एकुण १,७०,०००/-रुपये किमतीचा मुद्देमाला सह **आरोपी १)गोविंदसिंग ठानसिंग बरनाला, वय-४५,रा.सीरवेल महादेव ता.भगवानपुरा जि.खरगोन, (म.प्र.), २)निसानसिंग जिवनसिंग बरनाला, वय-२३, रा.उमटी ता.वरला जि.बडवाणी ह.मु. रा.सीवेल महादेव ता.भगवानपुरा (म.प्र.)** यांना रावेर पोलीस स्टेशन हजर करण्यात आले. त्यांचे विरुध्द रावेर पोलीस ठाणे CCTNS गु.र.नं. २५४/२०२५, भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास पो.उप.निरी.तुषार पाटील, नेम.रावेर पो.स्टे. हे करीत आहेत.

वाढत्या गुन्हेगारी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोंकावर आळा घालण्याकरीता जनतेस जळगाव पोलीसांकडुन आव्हान करण्यात येते की, आपणास अशा अवैध गावठी हत्यार बाळगणाऱ्या इसमांबाबत माहीती प्राप्त झाल्यास, तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास संपर्क करुन माहीती द्यावी आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

जनसंपर्क अधिकारी
जळगाव पोलीस

